संपादकीय....

## बहुजनांची उपेक्षा कायम

आपण देशाचा अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिन साजरा केला. गेल्या ७७ वर्षांत देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. माणसाच्या अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजा आता किमान भागत आहे. २१ व्या शतकात शिक्षण आणि आरोग्य या मुख्य गरजा आवश्यक झाल्या आहेत. सरकारने 'शिक्षण हक्क कायदा' करून सुध्दा कित्येक मुले शिक्षणापासून वंचित आहेत. चांगले शिक्षणासाठी पालकांना वणवण करावी लागत असल्याचे वास्तव आहे. महापालिका, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चांगले शिक्षण मिळत नसल्याच्या पालकांच्या तक्रारी आहेत. हे वास्तव नाकारता येत नाही. चांगले व दर्जेदार शिक्षणासाठी खासगी शाळा टेंभा मिरवितात मात्र तेथे विद्यार्थ्यासह पालकांची पिळवणूक हे सर्वश्रुत आहे. सरकारी मराठी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा पट दिवसे दिवस झपाट्याने कमी होताना दिसत आहे. सरकारी शाळा अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळांकडे लक्ष न देता, विना अनुदानित शाळा सुरू करत आहे. अशा शाळां मध्ये ना कुशल शिक्षक ना सोई-सुविधा आहेत.

'कुशल' यासाठी शब्दप्रयोग केला कारण पुण्यातील ज्ञानप्रबोधिनी शाळेतील विद्यार्थ्यांना 'अभ्यास कौशल्य' याचे धडे दिले जातात. यामध्ये पेन कसा पकडावा, लिहावे कसे, वाचावे कसे याची तंत्रशुध्द धडे दिले जातात . यासह अभ्यासाचे चिंतन व मनन कसे करावे (माईंड मॅप व मेमरी) याचे विज्ञानावर आधारीत कौशल्य शिकविली जातात. त्यामुळे येथील विद्यार्थी विविध स्पर्धा परिक्षांमध्ये यशस्वी होतात. असे धडे गेल्या ७५ वर्षांत सरकारी शाळांमध्ये दिल्याचे आठवत नाही. केवळ पोपटपंची शिकविले जाते. तेच विद्यार्थी परीक्षेच्या पेपर मध्ये रट्टा मारतात. त्यामुळे पदवीधर झालेल्या विद्यार्थ्याला नोकरी शोधताना तारेवरची कसरत करावी लागते. नोकरी लागलीच तर ते फार काळ टिकेल याची शाश्वती नसते.

सरकारी शाळेतील इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थांना इंग्रजी, गणित असो वा विज्ञान याचे सखोल ज्ञान व कौशल्य शिक्षक देत नसल्यामुळे विदयार्थी पुढे स्पर्धा परिक्षांमध्ये टिकत नाही. डॉक्टर , वकिल, अभियंता तर लांबच आहे. त्यामुळे सरकारी शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची फार गरज आहे.

कोरोनाचा प्रभाव जगावर दिसून आला. आपल्या देशात आरोग्याच्या सोई-सुविधांचे पितळ उघडे पडले. आपल्या येथील आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळा मुळे आपण कोरोनावर नियंत्रण मिळविले खरे पण भविष्यात संसर्गजन्य आजार आल्यास आपण कसे लढू हे मात्र सांगणे कठिण आहे. सर्वसामान्यांना चांगल्या आरोग्य सुविधा अजूनही मिळत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आरोग्य योजने संदर्भात घोषणा करणार आहे. मात्र त्याची अंमलबजावणीसाठी बराच कालावधी लागले. आदिवासी भागात , खेड्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात निवासी डॉक्टर हे पद असते मात्र डॉक्टर या ठिकाणी राहत नाहीत. आरोग्य केंद्रातील परिचारिकांवर काम सोपवून डॉक्टर शहराकडे धूम ठोकतात. सरकारी डॉक्टरांना नॉन प्रॅक्टीस अलाऊस अर्थात पगाराच्या पस्तीस ते चाळीस टक्के पगार अधिक दिला जातो. त्यांनी खासगी रुग्णालयात किंवा स्वत:च्या दवाखान्यात प्रॅक्टीस करू नये म्हणून हा अतिरिक्त पगार दिला जातो. मात्र अनेक सरकारी रुग्णालयातील डॉक्टर खासगी रुग्णालयात प्रॅक्टीस करतात. अनेकांनी स्वत:ची रुग्णालये थाटली आहेत. त्यामुळे ते निवासी पद असलेल्या ठिकाणी राहत नाही. याचा फटका गोर-गरिब जनतेला बसतो. त्यांना वेळेवर उपचार मिळत नाही. याची दखल ना संबंधित प्रशासन घेते ना लोकप्रतिनिधी.

देशातील शिक्षण व्यवस्था सुधारली आणि आरोग्य सुविधा चांगल्या झाल्यातर जगात भारत सर्व क्षेत्रात अग्रेसर असेल. आता ५ ऋ सुरू होत आहे. त्यामुळे तंत्रज्ञान झपाट्याने बदलेल पण ही गती पकडण्यासाठी असेली क्षमता गोर-गरीब बहुजन, आदिवासींमध्ये असणार आहे का? असा प्रश्न पडतो. कारण गरिब-श्रीमंत जसे वर्ग आहेत तसे तंत्रज्ञान युक्त कौशल्य व अकुशल असा वर्ग पडणार आहे. त्यामुळे कमी वेळेत, कमी श्रमात जास्त पैसे मिळविणार वर्ग व दिवसभर काबाड कष्ट करून कमी मजुरी किंवा पगार मिळवणारा वर्ग असे दोन वर्ग पडलै आहेत.

**एआय तंत्रज्ञान सुसाट**

तीन दशकांपूर्वी संगणकयुग होते. त्याकाळी ज्यांनी संगणकाचे ज्ञान घेतले ते आज जगाच्या कानाकोपऱ्यात आहेत. तर आजही देशातील खेडोपाड्यात संगणकाचे ज्ञान आले नाही. त्यामध्ये सध्या एआय तंत्रज्ञान सुसाट वेगाने येत आहे. ह ज्ञान जो घेईल तो जगावर राज्य करेल. त्यामुळे ज्यांच्याकडे पैसा ते हे ज्ञान घेतील व ज्यांच्याकडे नाही ते या ज्ञानापासून वंचित राहतील. सहाजिकच पुन्हा पुढील दहा बारा वर्षात जग बदलले असेल. पुन्हा आर्थिक , सामाजिक व सांस्कृतिक विषमता वाढणार आहे.. ही समस्या मोठी त्यामुळे सर्वांना चांगले व दर्जेदार शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा मिळणे हे देशा समोरचे मुख्य प्रश्न असणार आहे. तरच गरिब व श्रीमंतामधील दरी कमी होईल आणि ते खरे आर्थिकच नव्हे तर सर्वांगीण स्वातंत्र्य असणार आहे.

# रमेश सिप्पींच्या यशात वडिल जी.पी. सिप्पींचे जास्त योगदान!



शोलेला आज पन्नास वर्षे झाली. त्याचं यश साजरं करत असताना, सर्व कलाकारांची आठवण केली जात आहे. त्यात प्रामुख्याने दिग्दर्शक रमेश सिप्पी, लेखक जोडी सलीम, जावेद आणि त्या नंतर धर्मेंद्र, अमिताभ, अमजद खान आणि इतर! पण शोलेच्या यशात सिंहाचा वाटा किंवा प्रमुख योगदान होते ते त्याचे निर्माते रमेश सिप्पी यांचे वडील जी. पी. सिप्पी.

कारण शोलेची निर्मिती व्हावी ही मुळात इच्छा जी.पी. सिप्पी यांची होती. आणि त्यांनीच हा सिनेमा भव्य दिव्य बनावा, बनवावा असं स्वप्न देखील पाहिले. आणि त्यासाठीच शोलेच्या आधीच्या सीता और गीताचे बजेट होते पन्नास लाख, ते डबल करून शोले साठी त्यांनी बजेट ठरवले एक कोटी रुपये! आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे सिनेमा तयार होई पर्यंत, हे बजेट थोडे थोडके नव्हे तर तिप्पट झाले तीन कोटी रुपये! आणि तरीही जी.पी. सिप्पी यांनी कुठलीही तक्रार न करता किंवा एवढे पैसे कशाला लागतात? जरा कमी खर्च करा, वगैरे वगैरे अशा कोणत्याही शंका उपस्थित न करता, कोणतेही प्रश्न न करता बजेट सतत वाढले तरी खर्च करत गेले.

वडिलांनी पाहिलेलं भव्य दिव्य सिनेमाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी, वडिलांकडूनच हिरवा सिग्नल मिळाल्या नंतर रमेश सिप्पी यांनीही तोवर डाकूंचे सिनेमे ज्या राजस्थान सारख्या वाळवंटात, वा चंबळ खोऱ्यात शूट होतात, तिथे न करण्याचे ठरवून आपल्या कला दिग्दर्शक आचरेकर यांना मोठे खडक, टेकड्या वगैरे असलेले लोकेशन शोधण्यास सांगितले. आणि तसे, जसं हवं तसं लोकेशन बंगलोर जवळील रामनगरम नामक गावाजवळ मिळाले. आणि वडिलांच्या भव्य दिव्य सिनेमा बनविण्याच्या स्वप्नाचा पाठलाग सुरू झाला.

जी. पी. सिप्पी हे देशाची फाळणी झाल्यानंतर भारतात आले. प्रथम काही वर्ष त्यांनी मुंबईत फ्लॅट विक्री व्यवसाय सुरू केला. त्यात चित्रपटसृष्टीतील काही लोकांच्या ओळखी झाल्या आणि त्या ओळखीचा फायदा घेऊन ते हळूहळू फिल्म निर्माता म्हणून काम करू लागले. त्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नंतर सुपरस्टार झालेल्या राजेश खन्ना यांना पहिली संधी 'राज' या सिनेमात जी. पी. सिप्पी यांनीच दिली होती. ज्याचा फायदाही

रमेश सिप्पी यांना आपल्या पहिल्या दिग्दर्शकीय सिनेमात पाहुणा कलाकार म्हणून राजेश खन्ना यांना घेताना झाला. अशा तऱ्हेने रमेश सिप्पी यांना त्यांच्या वडिलांचा भक्कम आधार आणि पाठिंबा सतत मिळत राहिला. म्हणजे दोन्ही अर्थांनी, नैतिकही आणि आर्थिकही!

शोले सिनेमा जर एखादा बाहेरचा दिग्दर्शक दिग्दर्शित करत असता, तर जी.पी. सिप्पींनी एवढा खर्च केला असता का? किंवा त्या दिग्दर्शकावर एवढा विश्वास टाकला असता का? असे प्रश्न, अशा शंका आपल्या मनात निश्चितच येतात. कारण शोलेच्या निर्मिती पूर्वी सुमारे दीड कोटींहून अधिक खर्च करून बनविलेल्या मोघलेआझम सिनेमा वेळी अशी परिस्थिती अनेकदा निर्माण झाली होती. अधिकाधिक परफेक्शनच्या नादात दिग्दर्शक के. असिफ सिनेमाचं बजेट सतत वाढवत होते, खरंतर वाढवत होते म्हणण्या ऐवजी वाढत होते, असं म्हणावं लागेल.

त्यात एक दृश्य होते मोत्यांचे मणी जमिनीवर घरंगळत खाली पडतानाचे, ते प्रथम नकली मोत्यांचे घेण्यात आले होते, पण ते के. असिफ यांना पटले नाहीत आणि मग परफेक्ट शूट होण्यासाठी असली मोती मागविण्यात आले. अशा तऱ्हेने अनेक ठिकाणी, अनेक दृश्ये शूट परफेक्ट शूट व्हावी म्हणून बजेट सतत वाढत असल्याने, निर्माते शापुरजी हैराण झाले होते. त्यामुळे अनेकांनी त्यांचे कान भरले आणि के. असिफ यांना काढून दुसरा दिग्दर्शक घ्यावा, असेही सल्ले देण्यात आले. असो तर सांगायची गोष्ट हीच की निर्माते हे सिनेमाच्या बजेट बाबतीत जागरूक असत, आजही असणारच! एक कोटीचं बजेट दहा वीस लाखांनी वाढले तर समजण्यासारखे आहे, पण ते थेट तिप्पट झाले तर? तर एक तर बाहेरचा निर्माता असता तर म्हणाला असता , आहे या बजेटमध्ये बसवा, परफेक्शन वगैरे राहू द्या! पण केवळ त्यांना स्वत:लाच हा सिनेमा भव्य पद्धतीने बनावासे वाटत होते आणि ज्या प्रकारे एक स्वतंत्र गाव रामनगरम मध्ये वसविण्यात आले, एक हजार लोक तिथे वेगवेगळ्या कामांसाठी आणण्यात आले, त्यांचे राहणे, खाणं पिणं इत्यादी सर्व गोष्टींची काळजी घेतली गेली, इतकेच नव्हे तर शूटिंगसाठी शेकडो घोडे मागविण्यात आले, त्यांच्या देखरेखीसाठी कुशल लोक, तसेच फाईटिंगच्या विशेष शूटिंग तंत्रासाठी देखील परदेशी दिग्दर्शक, तंत्रज्ञ यांनाही पाचारण करण्यात आले होते. अमिताभ त्या वेळी मुंबईत दीवार सिनेमाचं शूटिंग करायचे आणि ते संपलं की विमानाने बंगलोरला जायचे, तसेच मॅक मोहनही छोट्या छोट्या सीन साठी मुंबई ते बंगलोर प्रवास करायचे, अशा अनेक कारणांमुळे फिल्म बजेट बाहेर गेली. पण निर्माते सक्षम होते, खिशाने पण आणि मनाने पण!

सिनेमाचं शूटिंग हे सुमारे तीन लाख फूट फिल्म इतकं झालं होतं असं म्हणतात! यावर काही निर्माते म्हणाले एवढ्या मध्ये आम्ही तीन चार सिनेमे बनविले असते. तीन लाख फूट फिल्म शूट आणि तीन वर्षे लागली सिनेमा पूर्ण व्हायला!

त्यावेळचे जे निर्माते दिग्दर्शक होते उदाहरणार्थ हृषीकेश मुखर्जी, चित्रपती व्हि. शांताराम आदी यांचं एक शेड्युल ठरलेलं असायचं. व्हि. शांताराम तर साधारण चाळीस, बेचाळीस दिवसात संपूर्ण सिनेमाचं शूटिंग संपवत असत. हृषीकेश मुखर्जींचे पण एकूण आपण सिनेमे पाहिले तर त्याचे लोकेशन, खर्च आदी गोष्टी अतिशय आटोक्यात असायच्या. मुळात ते कथानकच असं निवडायचे की त्यात अगदी साध्या लोकेशनवर सुटसुटीत आणि सहज मांडणी करून चित्रपट लवकरात लवकर पूर्ण होत असे, मग तो चुपके चुपके असो, आनंद असो की नमक हराम असो.

पुन्हा शोलेकडे येऊ या! मुळात शोले निर्मितीचं कथानकही रंजक आहे. जेंव्हा सीता और गीता नंतर जी.पी. सिप्पी आणि रमेश सिप्पी यांनी काही तरी मोठं करायचं ठरवलं तेव्हा सलीम जावेद यांनी त्यांना दोन कथा ऐकवल्या त्यात एक कथानक होते मजबूर सिनेमाचं ज्याची पटकथा संवाद सर्व तयार होते. आणि दुसरं कथानक होते शोलेचं जे केवळ चार ओळींची कल्पना होती. लष्करी अधिकारी, डाकू, कुटुंबातील सदस्यांची हत्या आणि लष्कर अधिकारी त्या डाकूचा बदला घेतो, इतकी स्टोरी लाइन! हे सर्व ऐकल्यावर रमेश सिप्पी यांचं मत होतं की शोलेच्या सर्व गोष्टी पटकथा, कास्टींग, लोकेशन वगैरे तयारीला वेळ लागेल तोपर्यंत मजबूर सिनेमाचं शूटिंग संपवता येईल.

पण .... इथे पुन्हा जी. पी. सिप्पींची भूमिका महत्त्वाची ठरली, त्यांनी त्यांच्या अनुभवातून सांगितले की मजबूर सिनेमा ची पटकथा तयार असली, तरी तो विषय आपण नंतर पाहू, प्रथम शोलेच्या चार ओळींच्या कथानकालाच विकसित करायला हवे, आणि तोच सिनेमा प्रथम हातात घेऊ, त्यानुसार सलीम जावेद यांनी पुढील तीन महिन्यांत संपूर्ण पटकथा संवाद लेखन पूर्ण केले. आणि मग सिनेमाचं शूटिंग सुरू झालं.

यावर रमेश सिप्पी म्हणतात, जर आम्ही तेंव्हा मजबूर सिनेमाचं शूटिंग सुरू केलं असतं तर कदाचित शोले जितका आज भव्य प्रमाणात बनला तसाच तो बनला असता याची शक्यता कमी झाली असती. शोले बनला असता हे नक्की, पण आज जसा बनला तसाच बनला नसता, त्यामुळे वडिलांनी सांगितल्यामुळे मजबूरची कल्पना बाजूला ठेवून आधी शोले बनवण्यातच, शोलेचा फायदा झाला हे नक्की

आणखी मागे जाऊन सांगायचे तर शोलेच्या जडणघडणी आधी दिग्दर्शक रमेश सिप्पी यांच्या जडणघडणी विषयी माहिती करून घेणे महत्त्वाचे ठरेल. रमेश सिप्पी यांनीही सात आठ वर्षांचे असताना एक दोन सिनेमात लहान मुलांच्या भूमिका केल्या होत्या आणि एका सिनेमात एका गुंडाची भूमिकाही केली होती. नंतर वडिलांच्या सांगण्यावरून ते अर्थशास्त्राची डिग्री शिक्षण घ्यायला लंडन मध्ये गेले. पण तीन चार महिन्यांतच ते त्या शिक्षणाला कंटाळले आणि त्यांनी वडिलांना फोन केला की मला या शिक्षणात तितकी मजा वाट नाहीये मी भारतात येऊनच काही तरी करेल. तेंव्हा तीन महिन्यांतच पोराने पैसे पाण्यात घातले, एवढा खर्च करून लंडनला पाठवले त्याचा काही फायदा नाही झाला, असं काही मुलाला ऐकवण्या ऐवजी वडील म्हणाले, ठीक आहे, मग तू पुन्हा भारतात ये, इथे तुझ्या पसंतीचे काम कर!

पुढील एक दोन आठवड्यातच रमेश सिप्पी मुंबईत आले, सकाळी सात ते दहा कॉलेज आणि तिथून ते थेट जिथे वडिलांच्या ज्या सिनेमाचं शूट असेल त्या सेटवर पोचत ते रात्री दहा वाजेपर्यंत! असं सलग आठ वर्षे सेटवर पडेल ते काम करणे, फिल्म निर्मिती तंत्र, मंत्र शिकण्यात घालवली, म्हणजे वय सतरा ते पंचवीस आणि मग त्यांनी दिग्दर्शनात पदार्पण केले फिल्म अंदाज पासून!

फिल्म अंदाजचे कथानकही त्या वेळेच्या फिल्म विषयापासून हटके होते. विधवा विवाहावर आधारित! बहुतेकांनी हे कथानक घेऊ नये असे सुचवले. पण तिथेही जी. पी. सिप्पी म्हणजे वडीलच पाठीशी उभे राहिले, म्हणाले गो अहेड! आणि मग राजेश खन्ना, हेमामालिनी आणि शम्मी कपूर यांचा 'अंदाज' आला आणि गाजलाही!

त्यामुळे मला असं वाटतं की शोलेच्या यशाचं मूळ हे रमेश सिप्पी यांच्या दिग्दर्शनाइतकेच, वडिलांच्या प्रोत्साहनात होते, नैतिक आणि आर्थिक पाठिंब्यात होते, आहे, असं म्हणावं लागेल!

**श्रीकांत वाघ पुणे**
**मोबाईल ९९२३३१६२११**

# राज्य महोत्सव : गणेशोत्सव

गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अतिशय उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा महत्त्वपूर्ण सण आहे. श्री गणेश हे विघ्नहर्ता, बुद्धीचे दैवत व मंगलकार्याचे अधिपती मानले जातात. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यचळवळीच्या काळात या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले. त्यामागचा उद्देश समाजातील एकता वाढवणे व स्वराज्याच्या लढ्यासाठी लोकांना एकत्र आणणे हा होता. त्यामुळे गणेशोत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकही महत्त्व प्राप्त झाले. गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव नसून तो समाजाला एकत्र बांधणारा, संस्कृती जपणारा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना मोठ्या प्रमाणात चालना मिळते. राज्याची परंपरा व संस्कृती जपली जाते. ही परंपरा आणि संस्कृती अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी आपला गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याची १८ जुलै २०२५ रोजी विधीमंडळात घोषणा केली. त्यानुसार शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून जाहीर केले. गणेशोत्सवाला शासनाकडून राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आल्यानंतर या महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रम आणि इतर कार्यक्रम समन्वयनासाठी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयाकडे जबाबदारी देण्यात आली.

**घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेश मंडळे**

या गणेशोत्सव काळात घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धे'चा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला. यात राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरीय प्रथम विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आज मितीस महाराष्ट्रभरातील ४०४ पेक्षा जास्त मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. घरोघरीच्या श्री गणेशांचे दर्शन व सार्वजनिक मंडळांच्या श्री गणेशांचे दर्शन घरबसल्या घेणे शक्य व्हावे यासाठी घरगुती व सार्वजनिक श्री गणेशांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व प्रसिद्ध सार्वजनिक मंडळाच्या गणपतींचे थेट दर्शन जगभरातील गणेशभक्तांना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, याकरिता सुरू करण्यात आलेल्या पोर्टलला देखील गणेशभक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. या पोर्टलमुळे प्रामुख्याने मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, श्री सिद्धिविनायक मंदिरातील सिद्धिविनायकाचे दर्शन, अष्टविनायकांचे व टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एकाच क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना घरबसल्या विविध जिल्ह्यातील व शहरातील गणपतींचे अतिशय सुलभ दर्शन होत आहे.

**रील स्पर्धा :**

गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळावे, यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने रील स्पर्धे चे आयोजन देखील करण्यात आलेले आहे. ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर, राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होत आहे. रील तयार करण्यासाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील तयार करावयाची आहे.

महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उतेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिक २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उतेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येणार आहे.

**विशेष उपक्रम :**

गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात राज्याच्या प्रत्येक विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना राबविणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्को मानांकन मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत,स्वदेशी संकल्पना असे विविध विषय घेऊनही हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. श्री गणेशाला वंदन करण्यासाठी पु.ल.देशपांडे अकादमीकडून 'आला रे आला गणराया आला' या विशेष गीताचीही निर्मिती करण्यात आली.

**जागतिक व्यासपीठ :**

गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना महाराष्ट्र राज्याबाहेर देखील व्यासपीठ मिळणार आहे. याचाच एक भाग म्हणून २७ ते २९ ऑगस्ट, २०२५ दरम्यान वन संशोधन केंद्र डेहराडून या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आला. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे १ सप्टेंबर २०२५ सांस्कृतिक कार्यक्रम झाला तर ३ सप्टेंबर २०२५ रोजी के एम गिरी सभागृह, बेळगाव या सीमावर्ती भागात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. सर सयाजीराव नगर वडोदरा गुजरात या ठिकाणी म्हणजेच ४ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा राज्यात मराठी बांधवांसाठी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात एक भरीव वाढ झाली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार, हे नक्की

**- संजय डी.ओरके,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

## मानाचे गणपती..



पुण्याचा गणेशोत्सव खूप महान
रोषणाई सजावट मिरवणूक छान
मानाच्या गणपतींचा मोठा थाट
दर्शनाला येतात भाविक अफाट
कसबा गणेशाचा पहिला मान
ग्रामदैवताचा असे बहुमान
दुसरा गणपती तांबडी जोगेश्वरी
पितळी देव्हाऱ्यात विराजली स्वारी
गुरुजी तालीम गणेशाला तिसरा मान
हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक छान
भव्य मूर्तीचा तुळशीबाग
चौथ्या गणपतीचा असे रुबाब
केसरीवाडा गणेशाची टिळकांनी केली सुरवात
पालखीतून निघते मिरवणूक थाटात
असे हे पाच मानाचे गणेश
पुणेकर बाळगतात अभिमान विषेश
मंडईच्या शारदा गणेशावर पुणेकरांची श्रद्धा
श्रीमंत दगडूशेठ गणेशाची सर्वांवर कृपा
भाऊसाहेब रंगारी,राजाराम, खडकमाळ
हत्ती गणपती,हिराबाग आणि जुनाकाळ
शेकडो मंडळांनी वाढवली उत्सवाची शान
देखाव्यातून होत आहे समाजाचे प्रबोधन
गणेश विसर्जनाची ख्याती महाराष्ट्रात
मिरवणूक चाले रात्रंदिवस अव्याहत

**श्री.सुदाम कृष्णाजी विश्वे,**
**( निवृत्त कलाशिक्षक )**
**मो नं. - ९८६०५८६१४७.**

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे - ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com